मांडके ह्युमन हॅपीनेस फाऊंडेशनचे

# श्रीमती. सुधाताई मांडके कॉलेज

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

## विद्यार्थी विकास मंडळ

## ✸भक्तियोग २०२५ (आंतरराष्ट्रीय योग दिवस )अहवाल.. ✸

दिनांक २१ जून २०२५ रोजी, आंतरराष्ट्रीय योग दिनाचे औचित्य साधून उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना व विद्यार्थी विकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने "भक्तीयोग २०२५" या विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमामध्ये सौ. सुधाताई मांडके महाविद्यालय, पुणे यांचा सक्रीय सहभाग होता. कार्यक्रमात महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी विविध योगासने, प्राणायामाचे प्रात्यक्षिक सादर केले तसेच कार्ययोग (Work Yoga) या संकल्पनेवर मार्गदर्शन करत उपस्थितांना प्रत्यक्ष सहभाग घेण्याची संधी दिली.

कार्यक्रमात वारकरी संप्रदायातील भक्तीयोगाचे महत्व अधोरेखित करण्यात आले. या दिवशी सद्गुरू माऊली सेवा मंडळ – दिंडी क्रमांक ५१४ आणि संत गणेशनाथ महाराज – दिंडी क्रमांक २३५ यांचे थांबे **खिलार वाडी, एरंडवणे, पुणे** येथे होते. आमच्या महाविद्यालयाच्या स्वयंसेवकांनी या दिंडींच्या सेवेमध्ये सहभाग घेत भक्तिभावाने सेवा कार्य केले. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक आरोग्यासाठी योगाचे महत्व सांगितले. तसेच त्यांनी वारकरी परंपरेतील अभंग, भजन, हरिपाठ यामध्ये भाग घेऊन भक्तीयोगाचे सादरीकरण केले. कार्ययोग म्हणजेच कर्म करताना ध्यान आणि समर्पणाची भावना ठेवून काम करणे, ही संकल्पना विद्यार्थ्यांनी प्रभावीपणे सादर केली."भक्तीयोग २०२५" या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये योगाभ्यास, भक्ती परंपरा आणि सेवाभाव यांचे महत्त्व रुजले. या उपक्रमामुळे त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासास मोठा हातभार लागला आणि त्यांना एक वैचारिक व आध्यात्मिक दृष्टीकोन मिळाला






# योग साधनेचे प्रात्यक्षिक क्षण














या कार्यक्रमादरम्यान **सद्गुरू माऊली सेवा मंडळ – दिंडी क्रमांक ५१४** व **संत गणेशनाथ महाराज – दिंडी क्रमांक २३५** या दिंडी प्रमुखांचा **विद्यार्थी विकास अधिकारी श्री. विश्वेश लोहार** यांच्या हस्ते सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आला.. या सत्काराच्या वेळी श्री. लोहार यांनी वारकरी परंपरेतील सेवाभाव, शिस्त, भक्ती आणि सामाजिक सलोखा याचे महत्त्व अधोरेखित करत विद्यार्थ्यांना ही परंपरा आत्मसात करण्याचे आवाहन केले.








# विद्यार्थ्यांकडून वारीतील भाविकांना टोपी व अल्पोपहार वाटप







“डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे यांच्या वतीने आपल्या महाविद्यालयाला ‘भारतीय संविधान’ पुस्तके प्रदान करण्यात आली. ही पुस्तके बार्टीचे प्रादेशिक प्रमुख श्री. उमेश सोनू सोनवणे यांच्या हस्ते देण्यात आली.



